# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः 17.11.2024** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या,**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन देशांच्या दौऱ्यावर नायजेरिया इथं पोहोचले
2. ‘मिशन झिरो डेथ’ द्वारे केलेल्या प्रयत्नांमुळे रेल्वे रुळांवरील मृत्यूदरात घट
3. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीदरम्यान मध्य रेल्वेकडून जादा रेल्वे गाड्यांची सोय
4. चीन मधील शाळेत झालेल्या चाकू हल्ल्यात 8 जण ठार तर 17 जण जखमी

आणि

5. राष्ट्रीय वरिष्ठ पुरुष हॉकी अजिंक्यपद अंतिम स्पर्धेत ओडिशाची हरियाणावर मात

**मोदी-त्रिदेश दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी नायजेरिया, ब्राझिल आणि गुयाना या तीन देशांच्या दौऱ्यावर आहेत. नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष बोला अहमद तीनुबू यांच्याशी ते आज चर्चा करतील. या बैठकीत दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारीचा आढावा घेण्यात येईल आणि द्विपक्षीय संबंध वाढवण्यासाठी काय करता येईल यावर चर्चा होईल. या चर्चेनंतर अनेक करारांवर स्वाक्षऱ्या होण्याची अपेक्षा आहे. पंतप्रधान मोदी नायजेरियातील भारतीय समुदायालाही संबोधित करणार आहेत. यानंतर उद्या पंतप्रधान G वीस शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी दोन दिवसांच्या ब्राझीलच्या दौऱ्यावर जाणार आहेत तर तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात ते गुयानाला जातील.

**रेल्वे मिशन**

‘मिशन झिरो डेथ’चा एक भाग म्हणून रेल्वे रुळांवरील मृत्यू कमी करण्यासाठी मध्य रेल्वेनं केलेल्या अथक प्रयत्नांमुळे, अत्यंत प्रभावी परिणाम दिसत आहेत. मध्य रेल्वेनं जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार जानेवारी ते ऑक्टोबर 2024 या कालावधीत रेल्वे रुळावरील मृत्युंची संख्या 14 टक्क्यांनी घटली आहे तर जखमी झालेल्या व्यक्तींची संख्या 10 टक्क्यांनी घटली आहे. अतिक्रमण हे या घटनांचं एक प्रमुख कारण आहे असं या प्रकरणांचं बारकाईनं विश्लेषण केल्यावर दिसून आलं असं मध्य रेल्वेनं म्हटलं आहे. या कालावधीत एकंदर 3 हजार 599 मृत्यू आणि जखमींच्या प्रकरणांपैकी 1

हजार 429 घटना अतिक्रमणामुळे घडल्या आहेत, हे प्रमाण जवळपास 40 टक्के आहे. अशा घटना कमी करण्यासाठी मध्य रेल्वे व्यापक जनजागृती मोहीम राबवून ठोस प्रयत्न करत आहे.

**जादा रेल्वे**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकिदरम्यान मध्ये रेल्वे कडून 19 आणि 20 तारखेला  जादा रेल्वे गाड्यांची सोय केली जाणार असल्याचं मध्य रेल्वेनं एका पत्रकाद्वारे प्रसिद्ध केला आहे.  छत्रपती शिवाजी महाराज स्थानक ते कल्याण आणि पनवेल दरम्यान सर्व स्थानकांवर या गाड्या थांबणार आहेत. 20 नोव्हेंबर ला होत असलेल्या मतदान प्रक्रिये दरम्यान कोणताही अडथळा नं येता सर्वांना मतदान करता यावं यासाठी ही सोय करण्यात आली असल्याचं प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**हवा गुणवत्ता**

हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोग आणि संबंधित अधिकाऱ्यानी हवेची गुणवत्ता निकृष्ट  असलेल्या नवी दिल्लीतील राष्ट्रीय राजधानी प्रदेशातील विभागांसाठी श्रेणी निर्धारित कृती आराखडा तयार केला आहे.  नवी दिल्ली इथं काल झालेल्या बैठकीमध्ये यासंबंधी काही कडक निर्णय घेण्यात आले. येत्या आठवडाभरात नागरिकांकडून आलेल्या तक्रारींचं निवारण तातडीनं करण्याच्या सूचना हवा गुणवत्ता आयोगानं संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी  प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि संबंधित संस्थांकडून सर्व नियमांचं काटेकोरपणे पालन होत असल्याची खात्री नोडल अधिकाऱ्यानी करून घेण्याच्या सूचनाही आयोगाकडून देण्यात आल्या आहेत.

**हवेची गुणवत्ता**

दरम्यान नवी दिल्लीतील राष्ट्रीय राजधानी प्रदेशातील हवेची गुणवत्ता अजूनही गंभीर श्रेणीत आहे, आज सकाळी 7 वाजता 428 हवा गुणवत्ता निर्देशांक नोंदवला गेला. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील 2 दिवस रात्री आणि सकाळच्या वेळी धुकं राहण्याची शक्यता आहे.

**एक पेड माँ के नाम**

एक पेड माँ के नाम या उपक्रमामध्ये सहभागी होऊन त्याला गती देणाऱ्या सर्वांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आभार मानले आहेत. जास्तीत जास्त लोकानी त्यांच्या आईच्या सन्मानार्थ एक झाड लावावं आणि शाश्वत ग्रहासाठी योगदान द्यावं असं आवाहन एका समाज माध्यमावरील संदेशात मोदींनी केलं आहे.

**राईट निवड**

अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ऊर्जा विभागाच्या प्रमुखपदी ख्रिस राईट यांची निवड जाहीर केली आहे. राईट हे लिबर्टी एनर्जी या जीवाश्म इंधनाच्या पुरस्कर्त्या संस्थेचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. ट्रम्प यांच्या तेल आणि वायूचं उत्पादन वाढवण्याच्या उद्दिष्टांशी त्यांची मतं जुळतील अशी अपेक्षा आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय हवामान बदलासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांबद्दल ट्रम्प यांच्या धोरणाचं ते समर्थन करतील अशी शक्यता आहे. हवामान बदलाच्या चिंतेला अतिशयोक्तीपूर्ण म्हणून नाकारण्यासाठी राईट ओळखले जातात आणि सध्या कोणतेही ऊर्जा संक्रमण होत नसल्याचं त्यांचं मत आहे.

**COP29**

संयुक्त अरब अमिरातीनं अझरबैजानमध्ये आयोजित COP29 दरम्यान “ग्लोबल एनर्जी एफिशिएन्सी अलायन्स” स्थापन करण्याच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची सुरुवात केली आहे. 2030 पर्यंत जागतिक ऊर्जा कार्यक्षमता दर दुप्पट करणे आणि उत्सर्जनात लक्षणीय घट होण्यास हातभार लावणे हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे. हा उपक्रम COP28 मधील 'UAE एकमत' या संकल्पनेवर आधारित आहे. UAE एकमतनं कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि शाश्वत संसाधन व्यवस्थापनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध देश आणि संस्था याना एकत्र आणलं. संयुक्त अरब अमिरातीनं ऊर्जा कार्यक्षमतेत आपलं कौशल्य सामायिक करून, ज्ञानाच्या देवणघेवाणीला प्रोत्साहन देऊन आणि खाजगी क्षेत्रासह प्रभावी भागीदारी मॉडेल तयार करून या युतीचं नेतृत्व करण्याची योजना आखली आहे. आफ्रिकन राष्ट्रांना मदत करण्यावर विशेष भर देऊन सर्वोत्तम पद्धतीचं संकलन आणि प्रसार करण्यावर ही युती लक्ष केंद्रित करेल. आफ्रिका खंडात वित्तपुरवठयाचे विविध पर्याय विकसित करणे तसंच शाश्वत उर्जेच्या प्रगतीकरीता महत्त्वपूर्ण तांत्रिक सहकार्य देणे यावर लक्ष देण्यात येईल.

**इस्रायल ड्रोन हल्ला**

इराकमधील इस्लामिक रेझिस्टन्स, या शिया मिलिशिया गटानं आज दक्षिण आणि उत्तर इस्रायलमध्ये करण्यात आलेल्या पाच ड्रोन हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली आहे. दक्षिण इस्रायलमधील इलात बंदरातील चार महत्त्वाची ठिकाणे आणि लष्करी छावण्या आणि उत्तर इस्रायलमधील एक लष्करी छावणीला  लक्ष्य करण्यात आलं असल्याचं या गटांन प्रसिद्ध केलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे. या ठिकाणांवर जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही. पॅलेस्टाईन आणि लेबनॉनमधील लोकांना पाठिंबा म्हणून हे हल्ले करण्यात आले असल्याचं या निवेदनात म्हटलं आहे. इस्राइलमधील महत्वाच्या ठिकाणाना लक्ष करण्याचं काम सुरूच राहील असंही या गटानं म्हटलं आहे. गेल्या वर्षी 7 ऑक्टोबरला गाझा पट्टीमध्ये इस्रायली-पॅलेस्टिनी संघर्षाचा उद्रेक झाल्यापासून, इराकमधील इस्लामिक रेझिस्टन्स या

गटानं गाझामधील पॅलेस्टिनींना पाठिंबा दर्शवण्यासाठी  इस्रायल आणि इस्राइलमधील अमेरिकेच्या विविध ठिकाणांवर  वारंवार हल्ले केले आहेत.

**चीन हल्ला**

चीन मधील जिआंगसू प्रांतातील एका शाळेत काल झालेल्या चाकू हल्ल्यात 8 जण ठार तर 17 जण जखमी झाले. जू या 21 वर्षीय संशयिताला घटनास्थळी पकडण्यात आलं असून त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे.  परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यानं प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे आणि कमी विद्यावेतन मिळाल्याच्या रागामुळे त्याने हे कृत्य केलं असल्याची माहिती तिथल्या पोलिसांनी दिली. बचावकार्य सुरू असून पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत. चीनमध्ये  या आठवड्यात, नागरिकांवर झालेला हा दुसरा हल्ला आहे.

**महिला हॉकी**

महिलांच्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत भारताचा सामना आज जपान बरोबर होणार आहे.  भारतीय महिला खेळाडूंनी आशयाई चॅम्पियन्स ट्रॉफी मध्ये विजयाची घोडदौड सुरू ठेवत चीन ला 3-0 नं हरवून सलग चौथ्यान्दा विजय प्राप्त केला आहे. जपाननं मलेशिया ला  2-1 असं हरवून आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी मध्ये आपला पहिला विजय निश्चित केला आहे. बिहार मधील राजगीर मैदानावर संध्याकाळी 4 वाजून 45 मिनिटांनी हा सामना सुरु होईल.

**पुरुष हॉकी**

राष्ट्रीय वरिष्ठ पुरुष हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत ओडिशाच्या शिलानंद लाक्रा यानं हॅट्ट्रिक साधत काल चेन्नई इथं झालेल्या अंतिम स्पर्धेत हरियाणाचा 5-1 असा पराभव करून ओडिशाला विजय मिळवून दिला. शिलानंदने तीन गोल केले, तर रजत आकाश तिर्की यानं सुरुवातीला मिळालेल्या संधीचं सोनं करून ओडिशाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर तिसऱ्या सत्रात प्रताप लाक्राने पेनल्टी स्ट्रोकमध्ये बदल करत ह्या आघाडीला बळकटी दिली. चौथ्या सत्रात  शिलानंद ओडिशासाठी अत्यंत महत्वाचा ठरला. हरियाणाचा एकमेव गोल जोगिंदर सिंगने केला. दरम्यान उत्तर प्रदेशने मणिपूरचा 2-1 ने पराभव करून स्पर्धेत तिसरं स्थान मिळवलं.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**